# सिद्धिविनायक स्थानक पूर्णत्वाकडे

## सरकते जिने, छताचे काम पूर्ण, ग्रॅनाइटने सजावट

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** उत्तर व दक्षिण मुंबईला जोडणाऱ्या 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३' प्रकल्पाचे काम जोमाने सुरू आहे. त्यामधील सिद्धीविनायक स्थानकाची उभारणी पूर्णत्वाकडे जात आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील हे महत्त्वाचे स्थानक आहे.

मेट्रो-३चे दक्षिणेकडील अखेरचे स्थानक हे कफ परेड तर उत्तरेकडे सीप्झनंतर ही मेट्रो आरे येथील कारशेडमध्ये जाईल. आरे कारशेडसंबंधी प्रकरणामुळे या प्रकल्पाला सुमारे दीड वर्षांचा विलंब झाला आहे. पण प्रकल्पातील विविध पायाभूत सुविधा उभारणींचे काम जोमाने सुरू आहे. याअंतर्गत अलिकडेच मरोळ नाका स्थानकाच्या काचेच्या कोंदणातील पायाभूत सुविधांचे काम सुरू झाले. त्यानंतर आता सिद्धीविनायक स्थानकाच्या पायाभूत सुविधांचे काम पूर्ण होत असल्याचे दिसून येत आहे.

मेट्रो-३मध्ये २६ स्थानके भूमिगत असतील. त्यातील सिद्धीविनायक स्थानकाचे सरकते जिने व उद्वाहनाचे काम अनुक्रमे ८५ व ५५ टक्के पूर्ण झाले आहे. याखेरीज स्थानकाला सुंदर दिसण्यासाठी ते ग्रॅनाइटने सजवले जात आहे. ग्रॅनाइटच्या विविध प्रतिकृती तेथे बसविल्या जात आहेत. ते कामही अंतिम टप्प्यात आले आहे. याखेरीज छतही बांधून होत आले आहे.



### पहिला टप्पा ७७ टक्के पूर्ण

मेट्रो-३चा पहिला टप्पा सीप्झ ते बीकेसी उत्तर असेल. पहिल्या टप्प्यातील चार प्रमुख कामांचा विचार केल्यास ते सरासरी ७७ टक्के पूर्ण झाले आहे. रेल्वे रूळ व रुळांना जोडणाऱ्या भागांचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. रुळांचे वेल्डिंगचे काम ६५.८ तर रूळ बसविण्याचे काम ४५.६ टक्के पूर्ण झाले आहे.

### काळबादेवीचे कामही जोरात

काळबादेखील स्थानकाचे काम दोन प्रकारच्या तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे सुरू झाले आहे. 'न्यू ऑस्ट्रियन' अर्थात एनएटीएम आणि पारंपरिक 'कट अँड कव्हर' अशा दोन्ही पद्धतीने हे स्थानक आकार घेत आहे. एनएटीएम पद्धतीत बोगदा खणण्यासाठी कमी जागा लागते. काळबादेवी हा वाहतुकीच्या कोंडीने व्यग्र व एकूणच दाटीवाटीचा भाग असल्याने तेथे बोगदा खणण्यासाठी जागा कमी आहे. त्यासाठीच या स्थानक उभारणीत एनएटीएम तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.